महाराष्ट्र शासन
मृद व जलसंधारण विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, ७वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दूरध्वनी क्र. : ०२२-२२८२९१६३ Email ID : ravi.vhatkar@nic.in

क्रमांक : आस्थाप-२०२१/प्र.क्र.६३/जल-५ दिनांक : २६ डिसेंबर, २०२३

## कार्यालयीन आदेश

मृद व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक दि.०३/०१/२०१९ व दि.१५/१२/२०२१ अन्वये मृद व जलसंधारण विभागाची विषयसूची निर्गमित करण्यांत आलेली आहे.

उपरोक्त विषयसुचीतील कार्यासन जल-१३ कडे नेमून देण्यांत आलेले गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना ही राज्यशासनाची अत्यंत महत्वाकांक्षी योजना असून जलसाठयांमधील गाळ काढणे, मोजणे व तो शेतकऱ्यांच्या मागणीनुसार शेतांमध्ये पसरविणे यासाठी अचूक स्वरुपाची आकडेवारी अद्ययावत ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेसंदर्भातील कामकाज अभियांत्रिकी स्वरुपाचे असल्यामुळे सदर योजनेचे कामकाज जल-०१ या कार्यासनाकडे सोपविण्यांत येत आहे.

हे आदेश तात्काळ लागू होतील. विभागाच्या विषयसूची मध्ये संबंधित विषय फेरवाटपाची नोंद घेण्यांत यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुनील चव्हाण)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री, मृद व जलसंधारण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री/राज्यमंत्री, मृद व जलसंधारण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव, मृद व जलसंधारण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, मृद व जलसंधारण, संभाजी नगर,
५) सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व कार्यासने, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवडनस्ती (जल-५).